49

**वन जमिनीवरील अनधिकृत अतिक्रमणे**
**काढून टाकण्यासाठी समयबध्द कृती योजना.**
**प्रशासकीय कार्यवाही व संनियंत्रणासाठी**
**विभीन्न स्तरावर समित्या स्थापन करणेबाबत**

**महाराष्ट्र शासन,**

23 SEP 20..

**महसूल व वन विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : एस-३०/२००२/प्र.क्र.५/भाग-३/फ-३.**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक :- ४ सप्टेंबर,२००२.**

**शासन निर्णय :-**

वन जमिनीवर अतिक्रमणांचा वाढता कल लक्षात घेऊन केंद्र शासनाने राष्ट्रीय वन धोरण १९८८ अन्वये ही अतिक्रमणे नियमित न करण्याचे जाहीर केले. तथापि राज्यांच्या आग्रहामुळे या घोषणेच्या अंमलबजावणीची बाब केंद्र शासनाकडून तपासण्यात आली. यापैकी काही राज्यांनी १९८० पूर्वी झालेली अतिक्रमणे नियमित करण्यास ते राज्य वचनबध्द असल्याचे स्पष्ट केले होते.अशी अतिक्रमणे नियमित करण्याचे प्रस्ताव केंद्र शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्याची कार्यपध्दती निश्चित करुन दिनांक १८.९.१९९० च्या पत्रान्वये केंद्र शासनाने ही बाब सर्व राज्याच्या निदर्शनास आणली आहे. तथापि वन जमिनीवरील अतिक्रमणे मोठया प्रमाणात वाढत असून त्यामुळे वन्यजीव संरक्षणास व पर्यावरणास मोठी हानी पोहचल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २३.११.२००१ रोजी रिट याचिका क्रमांक २०२/९५ (टी.एन.गोदावरम थिरुमल विरुध्द केंद्र शासन) मधील इंटरलॉक्युटरी ॲप्लीकेशन क्रमांक ७०३/ २००१ बाबत निकाल देताना वन जमिनीवरील अतिक्रमणे नियमित करण्यास केंद्र शासनाला मनाई केली आहे. अशा परिस्थितीत वन जमिनीवरील अतिक्रमणे विशेष करुन राज्यातील प्रभावशाली गटांकडून जंगलातील अतिदुर्गम भागात सर्व दूर पसरलेली अतिक्रमणे काढून टाकण्यासाठी एक समयबध्द कार्यक्रम तयार करणे आवश्यक आहे. याकरीता शासनाने विभिन्न स्तरावरील समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. सदर समित्यांची रुपरेषा व कार्यपध्दती पुढीलप्रमाणे राहील :-

**१. राज्यस्तरीय नियंत्रण समिती.**

| | | |
|---|---|---|
| १) मा. मुख्य सचिव | --- | अध्यक्ष |
| २) अप्पर मुख्य सचिव (गृह) | --- | सदस्य |
| ३) प्रधान सचिव (महसूल) | --- | सदस्य |
| ४) प्रधान सचिव (वने) | --- | सदस्य |
| ५) जमाबंदी आयुक्त व संचालक भूमि अभिलेख | --- | सदस्य |
| ६) प्रधान मुख्य वनसंरक्षक | --- | सदस्य सचिव |

**(कृ.मा.प.)**

GR – Removal of Encroachment – monitoring committee